Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ४९] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ९-१५, २०२१/अग्रहायण १८-२४, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. | **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१०९ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-७ | | |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०१८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक अका-भूसंपादन-कावि-८३८-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक १६०० अ, दिनांक ११ मे, २०१६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्ह्यांच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मलकापूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एल. ए. क्यु. २-मामुलवाडी, २०२०-२१, गाव मामुलवाडी, तालुका नांदुरा, जिल्हा बुलडाणा

| जमीन संपादित करावयाचे क्षेत्र | | | वगळणी करण्यात आलेले क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| अनुक्रमांक | भूमापन किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र | अनुक्रमांक | भूमापन किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
| (१) | (२) | (३) | (१) | (२) | (३) |
| | | हे. आर | | | हे. आर |
| १ | ७७ | ५ ४३ | १ | ७८ | ० ४० |
| | | | २ | ७८ | ० ६१ |
| | | | ३ | ७९ | ० ८६ |
| | | | ४ | ८० | ० ६२ |
| | | | ५ | ८० | ० ६२ |
| | | | ६ | ८१ | ० ६६ |
| | | | ७ | ८१ | १ ०० |
| | | | ८ | ८१ | १ ०१ |
| | | | ९ | ८८ | २ ४४ |
| | | | १० | ८९ | २ ३६ |
| | | | ११ | ९० | १ ३६ |
| | | | १२ | ९० | १ २० |
| | | | १३ | ९३ | २ ८० |
| | | | १४ | ९३ | २ ०० |
| | | | १५ | ९३ | ३ २४ |
| | | | १६ | ९४ | २ ०३ |
| | | | १७ | ९४ | २ ०२ |
| | | | १८ | १०८ | ० ६१ |
| | | | १९ | १०८ | ० ३८ |
| | | | २० | १०८ | ० ८१ |
| | | | २१ | १०८ | ० ४१ |
| | | | २२ | १०८ | ० ८४ |
| | | | २३ | १०८ | ० ६१ |
| | | | २४ | १०८ | १ २१ |
| | | | २५ | १०८ | ० ८३ |
| | | | २६ | १०८ | ० ४१ |
| | एकूण . . | ५ ४३ | | एकूण . . | ३१ ३४ |

**संपादनाचे प्रयोजन** —जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडीत क्षेत्रात जाणा-या मौजे मामुलवाडी, ता. नांदुरा, जि. बुलडाणा या गावाचे पुनर्वसनासाठी मौजे मामुलवाडी येथील ५.४३ हे. आर जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव.

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :– | जिगांव प्रकल्प (मोठा प्रकल्प). |
| प्रकल्पाचे वर्णन | :– | जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडित क्षेत्रात जाणा-या मौजे मामुलवाडी, ता. नांदुरा, जि. बुलडाणा या गावाचे पुनर्वसनासाठी. |
| समाजाला मिळणारे लाभ | :– | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योग धंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची–तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :—सदरचा प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून शेतक-यांची संमती आहे. सदरचे संपादनामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधित होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची–चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश**

अतिरिक्त संचालक, भारत सरकार, पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण भवन, लोधी रोड, नवी दिल्ली ११०००३ क्र. जे. १२०११-२२-२००७, आयएआय, दिनांक ११ फेब्रुवारी २००७ अन्वये पर्यावरण सर्वेक्षण मंजुरी झालेली असल्यामुळे भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ०६ चे परंतुक २ अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण लागू नाही.

**टीप :–** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कार्यालय, मलकापूर येथे निरीक्षण करता येईल.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०१९.

**शुद्धीपत्र**

क्रमांक अका-भूसंपादन-कावि-८९६-२०२१.—

या कार्यालयातील भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२, मामुलवाडी-२०२०-२१, जिगांव प्रकल्पाचे बुडित गावठाण मौजे मामुलवाडी, ता. नांदुरा या गावाचे पुनर्वसन मौजा मामुलवाडी या प्रकरणातील कलम ११ चे शुद्धीपत्र कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगाव यांचे पत्र क्रमांक ५३२५-रेशा ३-मौ. मामुलवाडी-भूसंपादन-२०२१, दिनांक १५ सप्टेंबर २०२१ नुसार प्रकरणातील कलम ११ ची प्रारंभिक अधिसूचना क्रमांक अका-भूसंपादन-मामुलवाडी-कावि-३७६-२०२१, दिनांक ९ एप्रिल २०२१, महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, एप्रिल २९-मे ५, २०२१ रोजी पान १-३, अ. क्र. ४६७ वर प्रसिद्ध झालेली आहे. त्यात खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.—

| | **च्या ऐवजी** | | **असे वाचावे** | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | गट क्रमांक | संपादन क्षेत्र हे. आर | गट क्रमांक | संपादन क्षेत्र हे. आर | शेरा |
| १ | ७७ | ५ ४३ | ७७ | ५ ४३ | कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांचे पत्र जा. क्र. ५३२५-रेशा ३-मौ.मामुलवाडी-भूसंपादन-२०२१, दिनांक १५-९-२०२१ नुसार अ.क्र. २ ते ११ मधील गट क्र. सरळ खरेदीने संपादित केल्यामुळे वगळण्यात आले आहे. |
| २ | ७८ | १ ०१ | ७८ | ० ०० | |
| ३ | ७९ | ० ८६ | ७९ | ० ०० | |
| ४ | ८० | १ २४ | ८० | ० ०० | |
| ५ | ८१ | २ ६७ | ८१ | ० ०० | |

**शुद्धीपत्र**-चालू

| | च्या ऐवजी | | असे वाचावे | |
|---|---|---|---|---|
| | | हे. आर | | हे. आर |
| ६ | ८८ | २ ४४ | ८८ | ० ०० |
| ७ | ८९ | २ ३६ | ८९ | ० ०० |
| ८ | ९० | २ ५६ | ९० | ० ०० |
| ९ | ९३ | ८ ०४ | ९३ | ० ०० |
| १० | ९४ | ४ ०५ | ९४ | ० ०० |
| ११ | १०८ | ६ ११ | १०८ | ० ०० |
| | एकूण . . | ३६ ७७ | एकूण . . | ५ ४३ |

बुलडाणा : **एस. रामामुर्ती** (भा.प्र.से),
दिनांक १६ नोव्हेंबर २०२१. जिल्हाधिकारी, बुलडाणा.

---

भाग १ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १०२०.

## जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भः-**(१) पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र. जिविशा-का.व.सु.-प्रतिबंधक-५१९१-२०२१, दिनांक २५ ऑक्टोबर २०२१.

(२) या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-३-आ.व्य.-कलि-कावि-१५२६-२०२१, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

### मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) व (३) लागू करणेबाबत

### आदेश

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-८३३-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक ४ नोव्हेंबर २०२१ ते ६ नोव्हेंबर २०२१ रोजी पावेतो हिंदू धर्मियांचा दिवाळी हा सण साजरा केला जाणार आहे. तसेच वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या संवेदनशील असून जिल्ह्यात मागील काळात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, सद्यस्थितीत जिल्ह्यात कोरोना विषाणू संसर्ग प्रादुर्भाव कायम असल्याने कोविड-१९ प्रतिबंधक उपायाअंतर्गत निर्गमित प्रतिबंधक निर्देशांचे अनुपालनाचे दृष्टीने निरंतर कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत राज्यात नोकरीमध्ये पदोन्नतीस मागासवर्गीयांना ३३% आरक्षण कायम ठेवावे या मागणीसाठी विविध कर्मचारी संघटनांकडून विविध प्रकारच्या आंदोलनाचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेले कृषी विधेयक, शेतकरी कर्जमाफी, पीक कर्जमंजुरी, दूध दरवाढ, वाढती महागाई, वीज बील माफी, शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच इतर विविध मागण्यांसदर्भात विरोधी पक्षाचे वतीने तसेच शेतकरी संघटना इत्यादीचे वतीने आंदोलनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाशिम जिल्हा जातीयदृष्ट्या आणि सण उत्सवाचे दृष्टीने अत्यंत संवेदनशील असून मागील काळात जिल्ह्यात घडलेल्या जातीय घटनांच्या प्रतिक्रिया आगामी सण-उत्सवाचे काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सुलभ व्हावे याकरीता दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भीय पत्र क्र. (१) या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा.प्र.से.), जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करून दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारित करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टींकरिता मनाई करण्यात आलेली आहे.–

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तीक्ष्ण वस्तू जवळ बाळगणे.

२. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

३. दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधने जवळ बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

४. व्यक्तींची प्रेते किंवा मनुष्यकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बीभत्स प्रदर्शन करणे.

५. वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितिमत्ता यांस धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणणे, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा इतर कोणत्याही जिन्नस/वस्तू तयार करणे किंवा त्याचा लोकांमध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्रा जमण्यास किंवा मिरवणूकीस मनाई करीत आहे. तसेच या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्रमांक (२) अन्वये वाशिम जिल्ह्यामध्ये कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनांचे अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या बाबींचे पालन करून प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अंत्ययात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरूप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहेत. तसेच आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी / दंडाधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात.

वाशिम : **शण्मुगराजन एस.** (भा.प्र.से),

दिनांक २८ ऑक्टोबर २०२१. जिल्हादंडाधिकारी, वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १०२१.

## अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ:–** पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांचे पत्र क्र. जिविशा-६७३४-२०२१, दिनांक २८ ऑक्टोबर २०२१.

### आदेश

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-१२५७-२०२१.—

उपरोक्त संदर्भान्वये अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये दिनांक ०१ जून २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्याकरीता कलम १४४ लागू करण्यात आली आहे. तरी अमरावती ग्रामीण जिल्ह्यांतर्गत कोरोना प्रतिबंधक नियमांमध्ये शिथिलता देण्यात आली आहे. तसेच दिनांक ४ नोव्हेंबर २०२१ रोजी दिवाळी निमित्त मोर्शी व वरुड तालुक्यांतर्गत महालक्ष्मी देवीची मोठ्या प्रमाणात स्थापना व विसर्जन करण्यात येते.

तसेच सण-उत्सवाचे औचित्य साधून अचानक कुठल्याही संघटनेकडून किंवा धार्मिक संघटनेकडून मिरवणूक व यात्रा उत्सव भरवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच लॉकडाऊन दरम्यान आलेल्या अडचणी करीता विविध स्थानिक शेतकरी संघटना व इतर संघटना, पक्ष आपल्या मागण्यांकरीता अचानक आंदोलने करू शकतात. वाढीव पेट्रोल व डिझेल दरवाढी विरोधात राजकीय संघटना, मोर्चा, धरणे, रॅली इत्यादी आंदोलने केली जात आहेत. त्याचप्रमाणे मराठा-धनगर समाजातर्फे आरक्षणाकरीता आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिल्ली येथे शेतकरी आंदोलन समर्थनार्थ पडसाद उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करून तसेच स्थानिक नागरिकांकडून व राजकीय पक्ष संघटनांकडून वेळोवेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्यांकरीता आंदोलने करतात, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वरिल बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित राहावी याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दिनांक ४ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक १८ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत लागू करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित राहावी यादृष्टीने, सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याचे दृष्टीने मी, आशिष बिजवल, अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार मुंबई पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (१)**

१. शस्त्र तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जिवित हानी होवू शकते असे शस्त्र.

२. विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतूक करणे.

३. दगड, विटा इ. क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे).

४. माणसाच्या/जमावाच्या एकत्रीकरणास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

५. जाहीररित्या ओरडणे, गाणे, संगीत वाजविणे, बीभस्त चाळे करणे, अंगविक्षेप करणे, चित्र-विचित्र कृती करणे, बदनामीकारक बोलणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ चे कलम ३७ (३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या मुंबई पोलीस कायदाचे कलम ३७ (२) अन्वये जारी केलेला आदेश दिनांक ४ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक १८ नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामीण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लघंनाबाबत मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधीतांवर उचित कायदेशिर कारवाई करिता मुंबई पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरिक्त कोणत्याही मिरवणुका/कोणत्याही रस्ता/ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ रोजी जारी केले.

अमरावती : **आशिष बिजवल,**

दिनांक २९ ऑक्टोबर २०२१. अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १०२२.

**वाचा :–**पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडील पत्र क्र. जिविशा-प्रतिबंधक आदेश-३७३०-२०२१, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१.

**आदेश**

क्रमांक गृहशाखा-डेस्क-१२-कावि-१२०१-२०२१.—

ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी यवतमाळ जिल्ह्यात बस दरात झालेली वाढ, अती पावसामुळे शेतीचे झालेले नुकसान संदर्भात किंवा ओबीसी आरक्षण संदर्भात निदर्शने, मोर्चा, आंदोलने तसेच मराठा आरक्षण, कृषी कायदा विरोधात तसेच वीज बिलासंदर्भात इ. कारणावरून जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतक-यांच्या वतीने कर्जमाफी, कांदा निर्यात बंदी व तसेच पेट्रोल-डिझेल यांचे वाढलेले

भाव या कारणांवरून सुद्धा आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या काळात हिंदू-मुस्लिम व अनुसूचित जातीच्या संघटनातर्फे विविध कारणांवरून मिरवणुका, रॅली, मोर्चासारखे आंदोलने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. इतर विरोधी राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, कर्मचारी संघटना यांचे द्वारा त्यांचे मागण्यांवर शासनाचे लक्ष केंद्रित करण्याकरीता धरणे, आंदोलने, निवेदने, मोर्चा, उपोषण इ. स्वरूपाचे आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील कालावधीत व संभाव्य आंदोलनाच्या दरम्यान यवतमाळ जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. (मध्यरात्री पासून) ते दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. (मध्यरात्री पर्यंत) जिल्ह्यात कलम ३७ (१)(३) महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक असल्याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी कळविले आहेत.

तरी वरील काळात यवतमाळ जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, ललितकुमार व-हाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ याद्वारे आदेशित करतो की, शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-याव्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्याजवळ,

१. शस्त्र, काठी, तलवार, बंदुका बाळगणार नाहीत.

२. लाठ्या, काठ्या किंवा शारीरिक इजा होण्यास ज्या कारणीभूत ठरतील व सहज हाताळता येतील अशी कुठलीही वस्तू जवळ बाळगणार नाहीत.

३. कोणतेही क्षारक पदार्थ व स्फोटक द्रव्य बाळगणार नाहीत.

४. दगड, क्षेपणिक उपकरणे किंवा ब्लास्टिंग किंवा प्रवर्तक क्षेपणास्त्रे गोळा करून ठेवणार नाहीत किंवा जवळ बाळगणार नाहीत.

५. आवेशी भाषणे/अंगविक्षेप, विटंबनात्मक नकला करणार नाही. सभ्यता व नितीमत्तेला बाधा येईल किंवा ज्यामुळे जिल्ह्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा अशी कोणतीही वस्तू जवळ बाळगणार नाहीत किंवा ठेवणार नाहीत, व्यक्तींच्या किंवा शवांच्या किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाहीत.

६. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणूनबुजून दुखावण्याच्या उद्देशाने वाद्य वाजविणार नाहीत किंवा जाहीरपणे असभ्य वर्तन करणार नाहीत.

तसेच ज्याअर्थी, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम ३७ (१)(३) अन्वये यवतमाळ जिल्ह्यात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई करीत आहे.

आणखी असेही आदेशित करीत आहे की, प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर कोणतेही शासकीय कर्तव्यावर कार्यरत शासकीय/निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाही. या आदेशामधून विशेषरित्या मिरवणुका/कार्यक्रम यांना (शासकीय/निमशासकीय कर्मचारी यांचे धरणे/आंदोलन इत्यादी वगळता) सूट देण्याचे अधिकार संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस स्टेशन अधिकारी यांनी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

ज्या शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांना धरणे/आंदोलने/निदर्शने करावयाचे असेल व त्याकरीता ५ पेक्षा अधिक संख्येने जमावयाचे असल्यास त्याकरीता पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. त्यांना अशी परवानगी मागणारा अर्ज धरणे/आंदोलने/निदर्शने करावयाच्या दिनांकाच्या किमान १० दिवस अगोदर सादर करणे बंधनकारक असेल.

सदरील आदेश मी यवतमाळ जिल्ह्याच्या हद्दीपावेतो लागू करीत आहे. सदरचा आदेश दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजीचे ००.०१ वा. (मध्यरात्री पासून) ते दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ रोजीचे २४.०० वा. (मध्यरात्री पर्यंत) अंमलात राहील. हा आदेश बहुसंख्य व्यक्तींना लागू असल्यामुळे या आदेशाची प्रसिद्धी दवंडीद्वारे/ध्वनीक्षेपकाद्वारे तसेच इतर सर्व प्रसिद्धी माध्यमांद्वारे पोलिसांनी करावी. तसेच सदर आदेश सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस स्टेशन यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिद्धी देण्यात यावी.

हे आदेश दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

यवतमाळ : **ललितकुमार व-हाडे,**

दिनांक ११ नोव्हेंबर २०२१. अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.